# उपनिबंधक, सहकारी संस्था, एल विभाग मुंबई

**कक्ष क्र. ३११, ३ रा मजला कोकण भवन नवी मुंबई**

---

जा.क्र./मुंबई/उनि/एल वि/रामदर्शन को-ऑप. हौ.सो./७७अ/ २८२८ /२०१७ दिनांक :-३१ /१०/२०१७

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये आदेश

वाचावे: १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ.
२) रामदर्शन को-ऑप.हौ.सो.लि., संस्थेच्या प्राधिकृत अधिकारी यांनी सादर केलेला अहवाल दि.१९/०७/२०१७.
३) प्राधिकृत अधिकारी यांनी सादर केलेला दि.१८/०६/२०१७ रोजीचे निवडणुकीचे इतिवृत्त.

ज्याअर्थी, रामदर्शन को-ऑप.हौ.सो.लि., ही संस्था (यापुढे संस्था असा उल्लेख करण्यात आला आहे) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये पंजीकृत करण्यात आली असून तिचा नोंदणी क्रमांक एमयुएम-२/डब्ल्युएल/एचएसजी/टीसी/९०६५/२००४, दि.१८/०३/२००४ असा असून नोंदणीकृत पत्ता- रामदर्शन बिल्डिंग, प्लॉट नं.००१, असल्फा व्हीलेज, भटवाडी, घाटकोपर (प), मुंबई-८४ असा आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे कामकाज हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ तसेच संस्थेचे उपविधी व शासन परिपत्राकांतील सुचनेस अधिन राहून चालविणे कलम ७३ अन्वये संस्थेच्या व्यवस्थापक समितीवर बंधनकारक आहे. आणि,

ज्याअर्थी, संदर्भ क्रमांक २ अन्वये संस्थेच्या सन २०१६-१७ ते २०२१-२२ या कालावधीची निवडणुक घेण्यासाठी मा.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील दि.१८/०५/२०१७ च्या आदेशान्वये श्री. एस.एम.घोलप यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली होती. सदर आदेशान्वये प्राधिकृत अधिकारी यांनी दि.१८/०६/२०१७ रोजी अधिमंडळाची सभा ठेवलेली होती. सदर सभेत संस्थेतील एकूण २६ सभासद उपस्थित होते. परंतू फक्त १ नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेले होते. सदर संस्थेच्या व्यवस्थापक समितीची गणपुर्ती होत नसल्यामुळे सदर संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात यावी असा अहवाल प्राधिकृत अधिकारी यांनी त्यांचे दि.१९/०७/२०१७ रोजीच्या पत्राने या कार्यालयास सादर केलेले आहे. आणि,

ज्याअर्थी, प्राधिकृत अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार ते दि.१८/०६/२०१७ रोजी संस्थेची निवडणुक घेण्याकरता उपस्थित राहिले असता संस्थेच्या उपस्थित २६ सभासदांपैकी फक्त एका सभासदाने नामनिर्देशन पत्र दाखल केले. त्यामुळे संस्थेच्या व्यवस्थापक समितीची गणपुर्ती होत नाही. उपस्थित २६ सभासदांपैकी इतर कोणत्याही सभासदाने नामनिर्देशन पत्र दाखल करून व्यवस्थापक समितीत निवडून येण्यास स्वारस्य दाखविलेले नाही. त्यामुळे संस्थेतील कोणत्याही सभासदास संस्था चालविण्यास स्वारस्य राहिलेले नसल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे नोटीस देऊन सदस्यांचे म्हणणे मागविण्याची आवश्यकता वाटत नाही.

संस्थेच्या व्यवस्थापक समितीत पोकळी निर्माण झाली असल्याने आणि संस्थेची व्यवस्थापक समितीची निवडणुकीच्या कोणत्याही सभासदाने नामनिर्देशन पत्र दाखल न केल्यामुळे संस्थेत व्यवस्थापक समितीची नियुक्त न झाल्याने संस्थेचे कामकाज चालविण्यास नवीन व्यवस्थापक समितीची रचना करण्याची कार्यवाही त्वरीत करणेची गरज झाली आहे. या दृष्टीने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनीयम १९६० चे कलम ७७अ (१) (ii) च्या तरतुंदीनुसार संस्थेचे दैनंदिन कामकाज चालविणेसाठी प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक आहे. अशी माझी खात्री झाली आहे आणि,

सबब खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, शिरीष कुलकाळ, उपनिबंधक सहकारी संस्था, एल विभाग, मुंबई, रामदर्शन को-ऑप.हौ.सो.लि., रामदर्शन बिल्डिंग, प्लॉट

Scanned by CamScanner

नं.००१, असल्फा व्हीलेज, भटवाडी, घाटकोपर (प), मुंबई-८४या संस्थेच्या कामकाज पाहण्यासाठी श्री एस. एम. घोलप यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या दप्तराच्या व मालमत्तेचा दावा योग्य कागदपत्राचा संपूर्ण पदभार तत्काळ धारण करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा व संस्थेचा संपूर्ण कामकाज अदयावत करुन पुढील ६ महिन्याच्या आत नवनियुक्त गठीत व्यवस्थापक समितीला संस्थेचा पदभार सुपुर्द करावा.

हा आदेश आज दि ३१/१०/२०१७ रोजी माझ्या सही शिक्यान्वये दिला आहे.

उपनिबंधक, सहकारी संस्था, एल विभाग, मुंबई

(शिरीष सपकाळ)
उपनिबंधक
सहकारी संस्था एल विभाग, मुंबई

प्रति-

१) श्री एस. एम. घोलप, प्राधिकृत अधिकारी

२) चेअरमेन/सचिव, रामदर्शन को-ऑप.हौ.सो.लि., रामदर्शन बिल्डिंग, प्लॉट नं.००१, असल्फा व्हीलेज, भटवाडी, घाटकोपर (प), मुंबई-८४

२/- त्यांना कळविण्यात येते की त्यांनी संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा संपूर्ण ताबा नवनियुक्त समिती कडे हस्तांतरण करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३) शाखा व्यवस्थापक, दि.मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा कुर्ला/साकीनाका मुंबई.

***<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर :-</u>***

१) मा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (२) पूर्व उपनगरे मुंबई

उपनिबंधक
सहकारी संस्था एल विभाग, मुंबई

O/C

Rew

Scanned by CamScanner